18-19 -(1)

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019 Special Issue- 90 (B)

# महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता



मुख्य संपादक :

डॉ. धनराज धनगर

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by CamScanner

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2019 Special Issue – 90 (B)

## महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi),**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] India**

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 700/-



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | भारतातील मुस्लीम समाजातील दारिद्र्याची स्थिती | डॉ. वैशाली पाटील, शाईन शेख | 112 |
| 27 | १९९१ नंतर औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल | डॉ. डी. एम. चव्हाण | 115 |
| 28 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ | प्रा. सत्यम सानप | 119 |
| 29 | महाराष्ट्राच्या मानव विकासातील प्रादेशिक असमतोल | प्रा. अमोल पगार | 122 |
| 30 | महाराष्ट्रातील ग्रामीण विकासात कृषी पर्यटनाची भूमिका | डॉ. क्रांती बोरावके | 125 |
| 31 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ | डॉ. अशोक ससाणे | 130 |
| 32 | वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनांचा अभ्यास | डॉ. अनंत राठोड | 133 |
| 33 | महाराष्ट्रातील समतेसाठी दलित पँथरने केलेला संघर्ष | प्रा. जळबा नरवाडे | 139 |
| 34 | मध्ययुगीन महाराष्ट्रातील ग्रामरचना : विशेष संदर्भ 'बलुतेदार' | श्री किरण पवार | 142 |
| 35 | शिवकालीन महाराष्ट्रातील ग्रामजीवन | डॉ. ओमशिवा लिगाडे | 145 |
| 36 | मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ – एक चिकित्सक अभ्यास | प्रा. प्रेमचंद गायकवाड | 148 |
| 37 | रं.धों.कर्वेंची शिक्षणासंदर्भात भूमिका – एक चिकित्सक अभ्यास | डॉ. सुभाष बेंजलवार | 153 |
| 38 | महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समता संघर्ष | प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, डॉ. महादेव गव्हाणे | 156 |
| 39 | सारंगखेडा यात्रा ऐतिहासिक वारसा -एक अभ्यास | गोरख वाघ | 160 |
| 40 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळ | किशोर सूर्यवाड | 163 |
| 41 | महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतांचे योगदान | डॉ. किसान पालके | 166 |
| 42 | महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळ : एक अभ्यास | प्रा. सहदेव रोडे | 168 |
| 43 | १८१८ चे सत्तांतर केवळ राजकीय नसून आर्थिक बदलांची सुरुवात : विशेषतः शेतकऱ्यांवरील परिणाम | गणेश भामे | 173 |
| 44 | ब्राह्मणेतर स्त्री सुधारणा चळवळीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान -एक अभ्यास | प्रा. सहदेव रोडे, डॉ. किसान पालके | 177 |
| 45 | विदर्भाचे प्रादेशिक मागासलेपण आणि मानवी हक्काचा प्रश्न | डॉ. नंदकिशोर उगले | 181 |
| 46 | महाराष्ट्रातील उपप्रदेशवाद | डॉ. पंडित नलावडे | 185 |
| 47 | मराठा समाज : सामाजिक, राजकीय विश्लेषण | डॉ. आर. बी. वनारसे | 189 |
| 48 | बुलढाणा जिल्ह्यातील शहरीकरणाचा विकासक्रम : भौगोलिक अध्ययन | प्रा. अमोल भुयार, डॉ. विजय खराते | 196 |
| 49 | महाराष्ट्रातील इमारत व इतर बांधकाम कामगार आणि कामगार चळवळीची गरज : एक अभ्यास | अनिल झेंडे, डॉ.व्ही.ए.पाटील | 200 |
| 50 | महाराष्ट्रातील प्लास्टिक बंदी व पर्यावरणाचा असमतोल | डॉ. विजय गोरडे, प्रा. रवी रणदिवे, प्रा. पराग मेश्राम | 206 |
| 51 | महाराष्ट्रातील आर्थिक धोरणानंतरच्या कृषी अर्थसहाय्याच्या स्वरूपाचे विश्लेषण | डॉ. वासुदेव उईके | 211 |
| 52 | महाराष्ट्रातील ख्रिस्ती मिशनरी चळवळीत स्त्रियांची भूमिका | विश्वास वळवी | 215 |
| 53 | भूमी उपयोजन कार्यक्षमतेचा भौगोलिक अभ्यास – नंदुरबार जिल्हा | राजेंद्र पवार, विजय खराते | 220 |




Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 90 (B): महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# र.धों. कर्वेंची शिक्षणासंदर्भात भुमीका

**डॉ. बेंजलवार सुभाष गणपतराव**
विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा.

महाराष्ट्राला सुधारणावादी, पुरोगामी बनवण्यात र.धों. कर्वे अर्थात रघुनाथ धोंडो कर्वे यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. विसाव्या शतकात र.धों.नी महाराष्ट्रात आपल्या बुध्दिवादी भूमिकेतून वृत्तपत्रे व मासिकांचे माध्यम वापरुन वैचारिक प्रगल्भता निर्माण केलीञ आपल्या विचारांच्या प्रचार व प्रसारासाठी स्वतःच 'समाजव्यवस्था' नावाचे मासिक काढले. शिवाय सामाजिक स्वास्थ्य व स्त्रियांचे आरोग्य या दोन मुलभूत उद्देशांनी त्यांनी संततिनियमाची चळवळ चालवली. अशा प्रकारची संतितनियमानाची चळवळ चालवणारे ते महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील पहिले सुधारक होते. त्यांच्या सुधारणावादाच्या विचारांमध्ये स्त्री प्रश्न हाच केंद्रवर्ती विषय होता. स्त्रीपुरुषांमधील विषमता दूर होऊन त्यांच्यात निकोप संबंध प्रस्थापित व्हावेत हा त्यांचा विचार होता. त्यासाठी त्यांनी समाजात असणारे लैंगिक अज्ञान दूर व्हावे यासाठी शिक्षणक्षेत्रात लैंगिक शिक्षण मुलांना देण्या ाची आवश्यकता प्रतिपादन केली. बहुतांश सुधारकांनी शिक्षण हीच समाजसुधारणेची पुर्वअट मानली होती. अगदी त्याप्रमाणेच निकोप समाजाच्या उभारणीसाठी व सामाजिक स्वास्थ्यासाठी लैंगिक शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली. त्यांचा याच शिक्षणविषयक भुमिकेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आला आहे.

विसाव्या शतकातील महाराष्ट्रात सुधारकांनी व इंग्रजी सरकारने केलेल्या प्रयत्नामुळे बरीच शैक्षणिक प्रगती झाली होती. समाजाच्या वेगवेगळ्या स्तरांपर्यंत शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार झालेला होता. र.धों.च्या पूर्वी व समकालातही समाज सुधारकांनी शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करुन त्यासाठी संस्थात्मक कार्य सुरु केले. र.धों.चे वडील महर्षी कर्वे यांनी तर स्त्री-शिक्षणाच्या कार्यासाठीच आपले आयुष्य वेचलेले होते. अशा परिस्थितीत र.धों.नी शिक्षणासंदर्भात संस्थात्मक कार्य केलेले नसले तरी त्यांच्या पुर्वी सुधारकांनी मांडलेली शिक्षणाची संकल्पना अर्थपूर्ण आणि व्यापक सर्वसमावेशक बनवण्याचे काम केलेले दिसते. र.धों.नी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला अधिकाधिक नैतिक कसे बनवता येईल याचा विचार केला आहे. शिक्षणामध्ये लैंगिक ज्ञानाचे महत्व प्रतिपादन करत असतानाच लैंगिक शिक्षणाची आवश्यकताही त्यांनी प्रतिपादन केली. लैंगिक शिक्षणाच्या माध्यमातूनच सामाजिक स्वास्थ्यही राखणे शक्य असल्याचे र.धों.नी सातत्याने पटवून दिलेले दिसते. त्यांनी तत्कालात लैंगिक शिक्षणाचे सांगितलेले तत्वज्ञान काळाच्या पुढे जाणारे होते. त्यामुळेच की काय तत्काळात ते समाजाने स्वीकारले नाही. वर्तमानातही त्याचा स्विकार फारसा केला जात नाही, परंतु आज बऱ्याच प्रमाणात त्यासंदर्भात सकारात्मक चर्चा होत असताना पहायला मिळते. त्यावरुन र.धों.च्या लैंगिक शिक्षणविषयक मतांचे महत्व लक्षात येते.

र.धों.च्या काळात शिक्षण प्रसाराचे कार्य बऱ्यापैकी झालेले असले तरी त्यामध्ये कोणकोणते विषय असावेत याबद्दल त्यांच्या मनात बरेच प्रश्न होते. त्यामुळे र.धों.नी प्रत्येक विषय वा सामाजिक प्रश्न आपल्या स्वतंत्र विचारांच्या भुमिकेतून सोडवण्याचा प्रयत्न केला. सामाजिक समस्या सोडवण्यासाठी त्यांच्या पूर्वीही अनेक सुधारकांनी शिक्षण ही पूर्वअट मानली होती. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न सोडवता येतात किंवा सामाजिक स्वास्थ्य राखण्यासाठी शिक्षणाचा उपयोग होऊ शकतो याची सत्यता र.धों.ना ही पटलेली होती र.धों.च्या शिक्षणविषयक भुमिकेत लैंगिक ज्ञानाला अधिक महत्व दिसते. त्याचबरोबर प्रचलित नीती -



Scanned by CamScanner

अनीतीच्या संकल्पनापलीकडे जाऊन मुलांना व मुलींना कशा प्रकारचे नैतिक शिक्षण देता येईल याचाही विचार ते करतात. शिक्षणाचे महत्व सांगत असतानाच शिक्षणाच्या योग्य दिशेचा उल्लेख ते आवर्जून करतात. 'एकदा का शिक्षणाची दिशा चुकुन मुलांच्या किंवा मुलीच्या मनांत कमकुवतपणा आला, म्हणजे हा रोग त्यांना जन्मभर पछाडतो इतकेच नव्हे तर त्यांच्या मुलांना देखील याचा संसर्ग होतो आणि असे हे पिढयान - पिढया चालते'.[१] हे रोखायचे असेल तर योग्य वेळीच शिक्षणाची दिशा चुकण्यापासून रोखणे र.धों.ना महत्वाचे वाटते. शिवाय मुला-मुलींना शिक्षण देत असतानाच योग्य त्या वेळी योग्य ते ज्ञानही देणे आवश्यक असल्याचे ते प्रतिपादन करतात.

शिक्षण ही प्रक्रिया निरंतर चालणारी व व्यापक अशी ज्ञानार्जन करण्याची प्रक्रिया आहे त्यामुळे ज्ञान हे मर्यादित असू नये. किंवा अमूक एक म्हणजेच शिक्षण, त्याच्या पलिकडे पाहू नये ही शिक्षणावरील व पर्यायाने ज्ञानावरील मर्यादा र.धों.ना मान्य नाही. अशा प्रकारचे निर्बंध ज्ञानावरती असू नये व पालकांनी अशा प्रकारचे निर्बंध आपल्या पाल्यावर घालू नयेत असे र.धों. म्हणतात. 'मुलांनी अमुक वाचता नये, मुलींनी अमूक वाचता नये, तरुणांनी अमुक वाचता नये, स्त्रीयांनी अमुक वाचता नये अशा प्रकारचे निर्बंध आईबाप वृध्द पुरुष व राजेराण्या घालीत असतात व या बाबतीत स्वतःलाच जास्त कळते अशी त्यांची कल्पना असते. परंतु यात वस्तुता कोणाचा कोणत्याही प्रकारचा फायदा नसतो असे आमचे मत आहे'.[२] ज्ञानावर निर्बंध घातल्यामुळे ज्ञानार्जनाची प्रक्रिया खुंटते. म्हणून ज्ञानावर निर्बंध असू नयेत, असे र.धों.चे मत बनलेले दिसते.

शिक्षणाच्या संदर्भातील स्वातंत्र्यच मुलांना नैतिकतेकडे नेईल असा त्यांना विश्वास वाटतो. या शिक्षणामुळे मुलांमध्ये स्वातंत्र्याची भावनाही निर्माण होईल या शिक्षणाला र.धों. एक नवीन प्रकारचे नैतिक शिक्षण म्हणतात. या नविन शिक्षणाला सुरुवात अर्थातच लहानपणापासून केली पाहिजे लहान मुलांना थोडेसे कळू लागताच त्यांचे मनात स्वातंत्र्याची भावना हळूहळू उत्पन्न केली पाहिजे. मुलांना असे भासविले पाहिजे की, जी गोष्ट त्यांना आज करता आली नाही ती थोडया प्रयत्नाने उद्या करता येईल. ती येणार नाही असे त्यांना वाटू देऊ नये. मुलगा किंवा मुलगी सर्वस्वी आपल्यावर अवलंबून आहेत असे त्यांना परोपरी जाणवू देऊ नये'[३] त्यामुळे त्यांच्यात परावलंबित्वाची भावना निर्माण होणार नाही. सतत प्रयत्न केल्यामुळे मुलांना नव-नव्या गोष्टी शिकता येतील म्हणून शक्यतोवर मुलांना केवळ मार्गदर्शन करावे. त्यामुळे मुले लहानपणापासून प्रयत्नवादी बनतील त्यातून त्यांच्या मनात नव-नव्या जिज्ञासा निर्माण होतील व त्या जिज्ञासांनी माहिती मिळवण्याचा प्रयत्न मुले स्वतः करतील. पालकांनी मुलांना सल्ला द्यावा त्यांच्यात कार्यप्रवणता निर्माण करण्यासाठी शक्य तोवर मार्गदर्शन करावे.

नैतिक शिक्षण, ज्ञानप्राप्तीचे स्वातंत्र्याबरोबरच र.धों.नी लैंगिक शिक्षणाचा आग्रही पुरस्कार केला. लैंगिक शिक्षणाची उपयुक्तताही त्यांनी समाजस्वास्थ्यातून पटवून द्यायचा कसोसीने प्रयत्न केला अर्थात ते स्वतः हेही मान्य करतात की, 'अशा प्रकारच्या लैंगिक शिक्षणाची गरज असते हा काही नवीन शोध नाही तर वात्सायनाला हा शोध प्राचीन काळीच लागलेला होता'.[४] र.धों.नी त्यांची सामाजिक स्वास्थ्यासाठी उपयुक्तता दाखवण्याचा प्रयत्न केला. लैंगिक शिक्षणाचे महत्व पटवून देत असताना ते म्हणतात की, योग्य मार्गांनी व सरळ प्रश्न विचारुन ही माहिती मिळत नाही हे पाहिल्यावर किंवा वाटल्यावर अन्य मार्गानी ती मिळवण्याचा प्रयत्न मुले व मुली करतात व त्याचा परिणाम बहुधा असा होतो की, त्यांना जी माहिती मिळते ती बहुधा विकृत व कधी कधी अगदी चुकीची मिळते व त्यांचे दुष्परिणाम त्यांना पुढे कित्येक वर्षे भोगावे लागतात'.[५] त्यामुळे योग्य वेळी योग्य ती लैंगिक माहिती मिळाल्यास समाजातील विकृतीही वाढणार नाही. त्याचा पर्यायाने सामाजिक स्वास्थ्यासाठीच उपयोग



Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
January-2019

होईल म्हणून र.धों. लैंगिक ज्ञानाचा पुरस्कार करतात. अर्थात हे लैंगिक ज्ञान मुलांना द्यायचे पहिले काम पालकांनीच करावे असेही र.धों.ना वाटते. मनुष्याच्या शारिरीक व्यापारांची सर्वप्रकारची माहिती प्रत्येक मुलाला व मुलीला करुन देणे हे त्यांच्या पालकांचे काम आहे. व ती ते सध्या मुळीच करीत नाहीत असे आमचे स्पष्ट मत आहे'.[६] त्यामुळेच मुलांना योग्य ते शरीरशास्त्रीय वा शारिरीक बदलासंदर्भातील माहिती प्राप्त होत नाही व ती मिळवण्यासाठी प्रयत्न करतात त्यातही योग्य ती माहिती मिळाली नाही तर त्याबद्दल मुलांच्या मनात कायम विकृती निर्माण होण्याची शक्यता अधिक असते. म्हणून लैंगिक शिक्षणाची आवश्यकता र.धों.ना वाटते.

र.धों. केवळ लैंगिक शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करुन थांबत नाहीत तर ते शिक्षण कसे द्यावे याचीही योग्य ती चर्चा आपल्या लेखांत करतात कारण लैंगिक शिक्षणाचे महत्व बऱ्याच जणांना पटलेले असले तरी ते कसे द्यावे याचे समाधानकारक उत्तर मात्र त्यांच्याकडे नसते. म्हणून र.धों.नी यासंदर्भात दिलेले उत्तर या ठिकाणी लक्षात घेण्यासारखे आहे. पालकांनी प्रथमतः हे शिक्षण मुलांना द्यावे असे गृहित धरले तर पालकांनाही लैंगिक विषयांची संपूर्ण शास्त्रशुध्द माहिती असेलच याची शास्वती नाही. तीच परिस्थिती शिक्षकासंदर्भातील आहे. शिवाय लैंगिक ज्ञान असूनही चालणार नाही तर योग्य त्या पध्दतीने समजावून सांगण्याचे कौशल्य पालक व शिक्षकांकडे असले पाहिजे. यासंदर्भात र.धों. म्हणतात की, 'नुसते ज्ञान असून भागत नाही, तर शिक्षण देण्याची पात्रताही अंगी असावी लागते. तेंव्हा या बाबतीत पहिली गोष्ट केली पाहिजे ती अशी की, शिक्षकांकरिता आणि आईबापांकरिता या विषयांचा एक शिक्षणक्रम आखून त्यांना प्रथम माहिती दिली पाहिजे'[७] तरच प्रारंभिक शिक्षणापासून योग्य ते लैंगिक ज्ञान योग्य पध्दतीने मुलांना देता येईल अन्यथा लैंगिक ज्ञान न मिळाल्यामुळे जे प्रकार समाजात घडतात त्यामुळे केवळ व्यक्तिचे नव्हे तर एकूणच समाजाचे स्वास्थ्य धोक्यात येण्याची शक्यता अधिक असते. र.धों.नी डॉक्टर आणि शिक्षक मंडळींनी लैंगिक शिक्षण मुलांना का आणि कसे द्यावे, या संदर्भात जे सविस्तर विवेचन केले आहे ते पाहता र.धों.चा लैंगिक शिक्षणासंदर्भातील व्यापक दृष्टिकोण लक्षात येतो.

सारांश र.धों. कर्वेनी सुचवलेली लैंगिक शिक्षणाची आवश्यकता आजही प्रत्यक्षात शिक्षण प्रक्रियेत आलेली नाही. त्यामुळेच सामाजिक स्वास्थ्याला बाधा पोहवणाऱ्या अनेक घटना समाजात घडताना दिसतात. हे स्त्रीयांवरील सामाजिक, कौंटुंबिक अत्याचाराचे बळजोरीचे प्रयत्न बलत्कार, विनयभंग, छेडछाड इत्यादीसारख्या समाजस्वास्थ्याला भेडसावणाऱ्या समस्या लैंगिक अज्ञानुळे वाढत चाललेल्या आहेत. अशा समस्यांवर उपाय म्हणूनच र.धों.नी स्वातंत्र्यपुर्वकाळात अशाप्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली होती त्याचा हा विचार शिक्षण विभागाने स्विकारल्यास समाजस्वास्थ्यासाठी महत्वाचा ठरु शकतो.

**संदर्भ -**

१. कर्वे, र.धों., (संपा.),समाजस्वास्थ्य, वर्ष ८, सप्टेंबर, १९३४, पृ. ७१.
२. कर्वे, र.धों., (संपा.),समाजस्वास्थ्य, वर्ष १०, जाने., १९३७, पृ. २१३.
३. कर्वे, र.धों., (संपा.),समाजस्वास्थ्य, वर्ष ८, ऑगष्ट, १९३४, पृ. ३९.
४. देशमुख, अनंत, (संपा.), असंग्रहीत र.धों., पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. २१३
५. कर्वे, र.धों., (संपा.),समाजस्वास्थ्य, वर्ष २, नोव्हें., १९२८,पृ. ११६.
६. कर्वे, र.धों. (संपा.), समाजस्वास्थ्य, वर्ष २, नोव्हें., १९२८, पृ. ११६.
७. देशमुख, अनंत, (संपा.), असंग्रहीत र.धों., पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. २१३



Scanned by CamScanner